REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० | पुणें, बुधवार, तारीख २६ जुलै, १९४४ | अंक ३०

Telephone 779




TELEGRAM Guest House Poona 2.

## जाहीर प्रकटन.

कळविण्यास आनंद वाटतो कीं, दि. २५ मे १९४४ रोजीं बंद करण्यांत आलेलें आमचें जेवणाचें खातें दि. २५ जुलै १९४४ पासून नेहमींप्रमाणें नवीन व्यवस्थेखालीं सुरू करण्यांत आलें आहे. तरी आमच्या पूर्वीच्या आश्रयदात्यांस अशी विनंति आहे कीं, त्यांनीं आपापल्या शिधापत्रिका पूर्वीप्रमाणेंच पूना गेस्ट हाऊसच्या नांवावर बदलून घेण्यासाठीं आमचेकडे आणून द्याव्यात. मध्यंतरीच्या काळांत आमच्या आश्रयदात्यांची जी गैरसोय झाली त्याबद्दल आम्ही अत्यंत दिलगीर आहोंत.

**पूना गेस्ट हाऊस.**
गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

### जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

**भट कं. सांगली,** S. M. C.
भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
**छाया** लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### रजिस्ट्रारांची परिषद्

सहकारी सोसायट्यांच्या प्रांतिक रजिस्ट्रारांची १४ वी परिषद् मुंबई येथें ३१ जुलै, १ ऑगस्ट व २ ऑगस्ट ह्या दिवशीं भरणार आहे.

### सर रघुनाथराव परांजपे ह्यांस मराठा चेंबरमध्यें अल्पोपहार

शनिवार ता. २२ जुलै १९४४ रोजीं सर रघुनाथराव परांजपे, हिंदुस्थानाचे ऑस्ट्रेलियांतील पहिले हायकमिशनर, ह्यांनीं मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळास भेट दिली. त्यावेळीं अल्पोपहाराची थाटाची व्यवस्था करण्यांत आली होती. चेंबरचे अध्यक्ष श्री. श्री. प्र. ओगले, प्रो. काळे व श्री. कामत ह्यांचीं समयोचित भाषणें झालीं.

### राष्ट्रीय युद्धआघाडीचें नेतृत्व गव्हर्नरांकडे

आपल्या प्रांतांतील राष्ट्रीय युद्ध आघाडीचें नेतृत्व ओरिसा प्रांताच्या गव्हर्नरांनींच स्वतःकडे घेतलें आहे.

### पुण्याहून मुंबईस भाज्या जाणार

मुंबई येथें भाज्यांचा तुटवडा पडला असून त्या अतिशय महाग झाल्या आहेत. पुण्यांत व इतर ठिकाणीं त्या खरेदी करून मुंबई-कडे पाठविण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे.

### मध्यवर्ती सरकारचा उत्पन्न-खर्च

हिंदुस्थान सरकारनें एप्रिल, १९४४ मध्यें आपल्या उत्पन्नापेक्षा १७¾ कोटि रुपये जास्त खर्च केला. १९४३ च्या एप्रिल-मध्यें तत्सम आकडा ११¾ कोटि रुपये होता. कर्जाच्या रकमेंत ५½ कोटि रुपयांची वाढ झालेली आहे.

### टोळधाड

जूनच्या पहिल्या पंधरवड्यांत राजपुताना, भवालपूर, खैरपूर, पतियाळा व पंजाबचे कांहीं जिल्हे ह्यांत टोळधाड आली होती. जून अखेर त्यांतील कांहीं टोळ्यांनीं मध्य हिंदुस्थानांतील संस्थानांत प्रवेश केला. सिंध व उत्तर बलुचिस्तान येथेंहि कांहीं टोळ्या आढळून आल्या.

### पंजाबमधील उद्योगधंदे

पंजाबच्या औद्योगिक परिस्थितीचा व नव्या औद्योगिक उपक्रमांचा विचार करण्यासाठीं पंजाबमधील पुढारी कारखानदारांच्या समितीची एक बैठक सिमला येथें नुकतीच झाली. पंजाबचे अर्थमंत्री, सर मनोहरलाल, हे अध्यक्षस्थानीं होते.

### दि सांगली बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल २ लक्ष रु., रिझर्व्ह व इतर फंड १ लक्ष, ८१ हजार रु.व ठेवी ४८¾ लक्ष रुपयांच्या आहेत. बँकेनें १६½ लक्ष रुपये सरकारी व इतर रोख्यांत गुंतवून २६ लक्ष रुपयांचीं कर्जे दिलीं आहेत. ३१-१२-४३ अखेरच्या वर्षी बँकेस ३६¾ हजार रुपये नफा झाला. त्यांतून १८¾ हजार रुपये वेगवेगळ्या फंडांत टाकण्यांत आले व भागीदारांस ७% डिव्हिडंड व २% बोनस मिळालें. बँकेची मजबुती निर्विवाद आहेच व ती आणखी वाढविण्याचें डायरेक्टरांचें धोरण स्तुत्य आहे.

### जर्मनीमधील ब्रिटिश युद्धकैद्यास पदवी

कॉव्हेन्ट्रीच्या लेफ्टनंट जे. मर्सर ह्या जर्मनीमधील ब्रिटिश युद्धकैद्यानें "पोलादी सांगाड्याचीं घरें" ह्या विषयावर निबंध लिहून ब्रिस्टल विश्वविद्यालयाची एम्. एससी.ची पदवी मिळविली आहे.

### स्था. स्व. संस्थांच्या नोकरांस महागाईभत्ता

मध्यप्रांत व वऱ्हाड येथील स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या नोकरांस महागाईभत्ता देतां यावा, ह्यासाठीं तेथील सरकार दरमहा दरमाणशीं तीन रुपये देणार आहे. ज्या स्वराज्य संस्था दरमहा किमान ६ रुपये माणशी महागाई भत्ता आपल्या शिक्षकांस देतील त्यांसच ही सरकारी ग्रँट मिळेल. सरकारला ह्याचा वार्षिक खर्च ५½ लक्ष रुपये येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांनीं कर वाढवून आपल्या उत्पन्नांत भर घालावी व इतर नोकरांसहि योग्य महागाईभत्ता द्यावा अशी सरकारची सूचना आहे.

### भडोचमधील शेतकऱ्यांस सवलत

भडोच आणि पंचमहाल जिल्ह्यांच्या भडोच भागांत इतर ठिकाणापेक्षां कपाशीच्या लागवडीचें प्रमाण गेलीं कांहीं वर्षें अधिक आहे, ह्यासाठीं तेथें कपाशीची लागवड सक्तीनें एकूण शेतीच्या एक षष्ठमांश इतकी आणणें कठीण आहे. ह्याकरितां, ती एक चतुर्थांश इतकी आणण्यास मुंबई सरकारनें परवानगी दिली आहे. अर्थात् तेथील प्रत्येक शेतकऱ्यानें इतर ठिकाणांप्रमाणें दोन तृतीयांश जागेंत धान्यच पेरलें पाहिजे व कोणीहि गतवर्षींपेक्षां ज्यास्त प्रमाणांत कपास पेरतां कामा नये. वहातुकीच्या अडचणींत मात्र सुधारणा होईल अशी शेतकऱ्यांनीं अपेक्षा करूं नये व कपाशीस अमूक किंमत मिळेलच, असेंहि मानूं नये, असा इशारा मुंबई सरकारनें दिला आहे.

### अमेरिकेची सैन्यभरती

अमेरिकेनें आतांपर्यंत गेल्या ३० महिन्यांत सुमारें १ कोटि लोकांची सैन्यांत भरती केली आहे. म्हणजे, दरमहाची सरासरी ३ लाखांवर जाते.

### उत्तर बिहारमध्यें कॉलऱ्याची साथ

उत्तर बिहारमधील चार जिल्ह्यांत गेल्या तीन महिन्यांत कॉलऱ्यानें ३४ हजार लोक मरण पावले.

### पोस्टांतील विलंब दूर करण्याचा यत्न

पोस्ट व तारखात्याच्या कामांतील विलंब कसा टाळतां येईल ह्याचा विचार करण्याकरितां सर्व प्रांतांच्या पोस्ट मास्तर जनरल ह्यांची एक परिषद् लवकरच दिल्ली येथें भरविण्यांत येईल, असें समजतें.

### भांडवल उभारणीच्या नियंत्रणाचा हेतु

"नवीन कंपन्यांच्या भांडवल उभारणीवर नियंत्रण घालण्याचा हेतु युद्धफंडाची भरती करण्याचा नाहीं. युद्धफंडांत नवीन भांडवल तूर्त गुंतविण्यांत यावें, ही अट घालण्यांत लोकांजवळ सध्या असलेला विपुल पैशाचा ओघ अयोग्य उपक्रमांकडे जाऊं न देणें व भागीदारांचें हित पहाणें, हाच सरकारचा उद्देश आहे. युद्धानंतर कांहीं धंदे निघण्यासारखे नसले, तर भागीदारांचे पैसे त्यामुळें परत होऊं शकतील.":– सप्लाय खात्याचे प्रमुख, सर रामस्वामी मुदालियार, ह्यांचें भाषण.

### झेकोस्लोव्हाकियांतील चलनवाढ व त्याच्या जर्मनींतील शिल्लका

झेकोस्लोव्हाकियाच्या नॅशनल बँकेचें जर्मन राइश बँकेकडे ३२ अब्ज क्राऊन म्हणजे २३ कोटि पौंड इतकें येणें फेब्रुवारी, १९४४ अखेर साचलें आहे, परंतु तें परत मिळण्याची आशा नाहीं. चलनविषयक मागणी पुरविणें नेहमीच्या झेक छपाई कचेरीस अशक्य झालें असल्यामुळें, खासगी छापखान्यांकडे नोटा छापण्याचें काम देणें जर्मनीस आवश्यक झालें आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २३४ |
| २ रूरल डेव्हलपमेंट खात्याची कामगिरी ... | २३५ |
| ३ सहकारी स्टोर्स व युद्धोत्तर मंदी ... | २३६ |
| ४ प्रांतिक सहकारी त्रैमासिक | २३६ |
| ५ स्फुट विचार .. ... | २३७ |
| कपाशीच्या कमाल व किमान किंमती— नियंत्रित किंमतींचा विचार—अन्नपुरवठ्याची दिल्लींत चर्चा | |
| ६ भाडेकरी व घरमालक... | २३८ |
| ७ कराराची पूर्तता व अडवान्सची रकम ... | २३८ |
| ८ हिंदी शेतीस कृत्रिम खतांचा पुरवठा ... | २३९ |
| ९ पुणें येथें सहकारी शिक्षणाचा वर्ग ... | २४० |



# अर्थ

बुधवार, ता. २६ जुलै, १९४४


## रूरल डेव्हलपमेंट खात्याची कामगिरी

### "अधिक धान्य पिकवा" मोहिमेचा परिणाम

मुंबई प्रांताच्या रूरल डेव्हलपमेंट खात्याच्या ३१ मार्च १९४३ अखेर संपलेल्या वर्षाचा संक्षिप्त अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून ह्या खात्याच्या उपयुक्त कार्याची कल्पना येईल. चांगल्या सहकारी पतपेढ्यांचें कार्यक्षेत्र वाढविण्याचा खात्यानें प्रयत्न केला. तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्सची संख्या १०७ची ११२ झाली व त्यांनीं शेती सुधराईचे संबंधांतील आपलें काम चालू ठेवलें. " अधिक धान्य पिकवा " मोहिमेस ह्या संस्थांनीं चांगल्या तऱ्हेनें हातभार लावला. बेटर फार्मिंग सोसायट्यांची संख्या ३८ ची ४६ झाली. तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्सच्या धर्तीवरच परंतु जास्त मर्यादित विभागांत त्यांचें काम चालू असतें. बांध व ताली घालणें आणि जनावरांची सुधारणा करणें हीं त्यांची प्रमुख कामें होत. बेटर फार्मिंग सोसायट्यांचे हातून सध्या होते त्यापेक्षा पुष्कळच अधिक भरीव कामगिरी होण्यास वाव आहे.

सहकारी सेल सोसायट्यांची संख्या २५ नें वाढून ती १२४ झाली. मुंबई सहकारी मार्केटिंग सोसायटीनें बऱ्याच रकमेचा व्यवहार केला. गुजरात व कर्नाटक येथील कपास विक्रीच्या सहकारी सोसायट्यांनीं कपाशीच्या विक्रीचे संबंधांत उपयुक्त कार्य केलें. जरीला कपाशीच्या बियांचा प्रसार करण्याचेंहि त्यांनीं काम केलें. अहमदाबादच्या बटाटे पेरणारांच्या असोसिएशननें सिमल्याहून चांगल्या बटाट्याचें बेणें आणवून शेतकऱ्यांत त्याचा प्रसार केला. मुंबई प्रांतांतील कित्येक जिल्ह्यांमधील सहकारी संस्थांनीं बाजारभाव मर्यादेंत राखण्याचें व लोकांना अन्न व इतर जिन्नस उपलब्ध करून देण्याचें महत्त्वाचें काम केलें. बेळगांव व भडोच जिल्ह्यांत सहकारी संस्थांनीं स्वस्त धान्याचीं दुकानें यशस्वी रीतीनें चालविलीं. धान्याच्या डेपोंचे बाबतींत ठाणें जिल्ह्यानें आघाडी मारली. त्या एकाच जिल्ह्यांत असे ७७ डेपो सुरू करण्यांत आले. सबंद प्रांतांतील एकूण ६३३ डेपोंमधून अहवालाचे वर्षीं २ लक्ष रुपयांपेक्षा जास्त किंमतीचें धान्य वाटण्यांत आलें.

बांध व ताली ह्यांचें शेती सुधारांईतील महत्त्व धान्यांत घेऊन त्याकडे आतां विशेष लक्ष पुरविण्यांत येत आहे. महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व जिल्हे व कर्नाटकांतील विजापूर जिल्हा ह्यांत बांध घालण्याचें काम बरेंच पुरें झालें. सर्व प्रांतांत मिळून ३१ हजार एकर जमीनींचें रक्षण करणारे १५ लक्ष फूट लांबीचे बांध घालण्यांत आले. पूर्व खानदेशांत ७,२४,४९७ फूट, अहमदनगर जिल्ह्यांत ६,८०,९९० फूट, भडोच व पंचमहालमध्यें ४,२४,००० फूट, पश्चिम खानदेशांत ४,१०,४०५ फूट, सोलापूर जिल्ह्यांत १,९२,१०० फूट, बेळगांव जिल्ह्यांत ८४,५८६ फूट, विजापूरमध्यें ६२,६०० फूट, अहमदाबादमध्यें ३०,००० फूट, पुणें जिल्ह्यांत २०,००० फूट व ठाणें जिल्ह्यांत ९,१५० फूट अशी बांधांची लांबी पुरी झाली. पिकें लावण्याच्या पद्धतींमधील सुधारणेचा प्रचार बहुतेक सर्व जिल्ह्यांत चालू होता. सुधारलेल्या अवजारांच्या वापराचाहि प्रचार करण्यांत आला. सुधारलेल्या बियांच्या प्रसारास " अधिक धान्य पिकवा " मोहिमेमुळें विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. शेतकी खात्याच्या डायरेक्टरांनीं बियांच्या पुरवठ्याची एक योजना आखली. १९४१-१९४२ चे मानानें १९४२-४३ मध्यें बियांच्या पुरवठ्याचे बाबत ज्यास्त यशस्वी कामगिरी झाली, असें म्हणतां येईल. कीड प्रतिबंधक इलाज, रानटी जनावरांपासून पिकांचें संरक्षण, नवीन झाडांची लागवड, पशुसुधारणा, गवत व कडबा ह्यांबाबत सुधारलेल्या पद्धतींचा प्रचार, इत्यादि संबंधांतहि रूरल डेव्हलपमेंट खात्यानें प्रयत्न केले. हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्यानें केलेल्या मागणीमुळें हातमागाच्या धंद्यांस चांगलेंच उत्तेजन मिळालें. डि. इंडस्ट्रिअल असोसिएशन्सना नवीन माग बसविण्यासाठी सरकारनें कर्जें दिलीं. अहमदनगर, खानदेश व सोलापूर ह्या जिल्ह्यांत विशेषतः उत्पादन पुष्कळच वाढलें. खेडेगावांचे रस्ते सुधारण्यासाठी ठिकठिकाणीं सप्ताह पाळण्यांत आले व कांहीं जिल्ह्यांसाठी खास कार्यक्रम आखले गेले.

पिकांच्या पाणी-पुरवठ्याच्या प्रश्नानें " अधिक धान्य पिकवा " मोहिमेच्या कारणानें विशेष महत्त्व धारण केलें. धान्याचे पिकांखाली ज्यास्त जमीन यावी ह्यासाठी सरकारनें कांहीं सवलती जाहीर केल्या, त्यांचा योग्य तो परिणाम झाला. साहजिकच कालव्यांच्या पाण्यास मागणी वाढली. कांहीं जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्डांनीं खेडेगावांच्या पाणी-पुरवठ्याच्या योजना हातीं घेतल्या. सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता ह्यासंबंधांत रूरल डेव्हलपमेंट खात्याच्या नोकरांनीं शक्य तें प्रचाराचें कार्य केलें व ज्या खेडेगांवांत वैद्यकीय मदतीची उणीव आहे अशा कांहीं ठिकाणीं ठराविक निवडक औषधांच्या पेट्या पुरवल्या. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार वाढविणें हें रूरल डेव्हलपमेंट खात्याचें एक प्रमुख कार्यच समजलें पाहिजे व त्या दृष्टीनें खटपट करण्यांत आली. नवीन शाळा उघडण्यांत आल्या, प्रौढांसाठी शिक्षणाचे वर्ग चालविण्यांत आले व शाळांच्या इमारतींच्या संख्येंत भर घालण्यांत आली. प्रचार व खेडेगावांची सुधारणा ह्यांसाठी मदतनीस शिकवून तयार करण्याचें काम राजापूर, बोर्डी, भडोच, धुळें, मांजरी व देविहोसुर येथें चालू होतें. वरील सर्व वृत्तांतावरून शेतीसुधारणा व खेडेगांवांची पुनर्घटना ह्या संबंधांतील कार्यक्षेत्र किती विस्तृत आहे ह्याची कल्पना येईल. हें कार्य यशस्वी होण्यास दीर्घ प्रयत्न व सर्वांचें सहकार्य ह्यांची आवश्यकता आहे.

## सहकारी स्टोर्स व युद्धोत्तर मंदी

मद्रास प्रांतिक कंझ्यूमर्स सहकारी स्टोर्स परिषदेचें दुसरें वार्षिक अधिवेशन सर एन. गोपाळस्वामी अयंगार ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतेंच पार पडलें. मि. ऑस्टिन ह्यांनीं परिषदेचें उद्घाटन करतांना मद्रास प्रांतांतील स्टोर्सच्या प्रगतीचा आढावा घेतला. ते म्हणाले: "१९०५ सालीं त्रिचिनापल्ली व कोइमतूर येथें सहकारी स्टोर्स स्थापन झाले, त्यानंतर त्यांची संख्या लवकर वाढली नाहीं. गेल्या महायुद्धापूर्वी त्यांची संख्या ११ होती. त्या महायुद्धानें नव्या स्टोर्सच्या स्थापनेस चालना दिली व १९२१ सालीं त्यांची संख्या १०३ भरली. पुढें बाजारभाव उतरल्यामुळें नफ्याचें प्रमाण घटलें आणि गैरशिस्त कारभार, व्यवस्थेचा भरमसाट खर्च, इत्यादींमुळें कित्येक स्टोर्स बंद पडले. चालू युद्धानें स्टोर्स सोसायट्यांना पुनः चांगले दिवस आणले आणि त्यांची संख्या आतां १,२०० वर गेली आहे. सभासदांची संख्या ४ लक्षांपेक्षा जास्त आहे. ह्या सोसायट्यांनीं जनतेचा विश्वास संपादन केला आहे; शांतता पुनः प्रस्थापित झाल्यावरहि तो टिकविण्याची जबाबदारी सोसायट्यांवर आहे." संक्रमणकाळांत सोसायट्यांनीं कोणती खबरदारी घ्यावी, ह्याचेंहि दिग्दर्शन मि. ऑस्टिन ह्यांनीं केलें.

अध्यक्ष, सर एन. गोपाळस्वामी, हे आपल्या भाषणांत म्हणाले: "सहकारी खात्याचे कांहीं अधिकारी व कांहीं बिनसरकारी कार्यकर्ते हे युद्धसमाप्तीनंतर निम्मे स्टोर्स बंद पडतील असें गृहीत धरूनच चालतात, असें दिसतें. आपण बदलत्या परिस्थितीस अनुसरून वागलों नाहीं, तर असें खरोखरच घडून येईल व त्यासंबंधांत दक्षता बाळगणें हें आपलें कर्तव्य आहे. चालू परिस्थिति व पुढें येणारी परिस्थिति ह्यांचें परिशीलन करून सहकारी चळवळीस मार्गदर्शन करण्यासाठीं लायक व तज्ज्ञ लोकांची, प्रांतिक सहकारी यूनियनची स्थायी समिति तात्काळ नेमण्यांत यावी. सरकारी नोकर, मध्यमवर्गीय कुटुंबें किंवा मोठीं वैयक्तिक गिऱ्हाइकें ह्यांचे गट जेथें असतील तेथेंच फक्त सहकारी स्टोर्स यशस्वी होऊं शकतील, हें टाउनसेंड कमिटीचें म्हणणें खरें असेल, तर नव्या कंझ्यूमर्स सोसायट्या स्थापन करण्यांत लोकांनीं व सरकारनें वेळ व शक्ति खर्च करण्यांत अर्थ काय आहे ? शहरांपेक्षा खेडोपाडीं कंझ्यूमर्स सोसायट्यांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होण्यावरच त्या चळवळीचें खरें यश अवलंबून आहे. खेड्यांतील सोसायट्यांच्या व्यवस्थेसाठी लायक चालक मिळण्याची अडचण खरी असली, तरी ती दूर केली पाहिजे. सामान्य खेड्यांत प्रत्येक स्वतंत्र कामासाठीं वेगळी संस्था काढण्यापेक्षा, मल्टिपर्पज सोसायट्यांच्या वाढीकडेच लक्ष पुरवणें उचित होईल व ह्या दृष्टीनें खेडेगावी स्टोर्स सोसायट्यांचें कार्यक्षेत्र हळुहळु वाढवलें पाहिजें."

सहकारी पतपेढ्यांचे रजिस्ट्रार, श्री. सत्यनाथन, हे म्हणाले: "सहकारी खातें आतां नव्या सोसायट्यांच्या स्थापनेस उत्तेजन देत नाहीं; जुन्या सोसायट्यांस मजबुती आणण्याकडेच त्यांचें विशेष लक्ष आहे. रेव्हेन्यू खात्यामार्फत नियंत्रित किंमतीस मिळणारा माल विकण्याचा स्टोर्सचा सध्याचा व्यवहार युद्धसमाप्तीनंतर टिकणार नाहीं; त्यांना स्वतःच्या पायावर उभें राहून हुशार व्यापाऱ्यांशीं स्पर्धा करावी लागेल. ह्या स्पर्धेस यश मिळविण्याची तयारी आतांपासूनच केली पाहिजे. भागभांडवल वाढवून रिझर्व्हहि वाढविले पाहिजेत. आपलीं गिऱ्हाइकें व्यवस्थेशीर कारभारानें आकर्षून घेऊन बांधून घेतलीं पाहिजेत. सहकारी स्टोर्सनीं आपल्या योजना आखून व बाजारावर लक्ष ठेवून आपली कार्यक्षमता वाढविली पाहिजे."

### प्रांतिक सहकारी त्रैमासिक

"बॉंबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्लीचा" ताजा अंक नुकताच प्रसिद्ध झाला असून त्यांत अनेक विचारपरिप्लुत लेख आहेत. युद्धोत्तर आर्थिक संवर्धनाच्या योजना हिंदुस्थानांत सरकारी व बिनसरकारी रीतीनें आखल्या जात आहेत, त्यांमध्यें सहकाराच्या पुनर्घटनेस योग्य स्थान कसें दिलें गेलें पाहिजे ह्या विषयावर प्रो. काळे ह्यांचा लेख आहे. प्राथमिक सहकारी पेढ्यांचें जाळें सर्व प्रांतभर पसरून त्यामध्यें भांडवलाचा पुरवठा व मालाची खरेदी-विक्री इत्यादि व्यवहारांची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर करण्याच्या उद्देशानें पहाणी प्रथम व्हावी असें त्यांत सुचवण्यांत आलें आहे. ह्या संस्थांच्या कारभारांत सल्ला देऊन त्यांचें सतत मार्गदर्शन करण्यासाठीं ग्रामसहायक शिकवून तयार करण्याची आवश्यकताहि त्यांत प्रतिपादली आहे. इन्स्टिट्यूटसारख्या संस्थांस बलवान करणें, सहकारी शिक्षणाची त्या संस्थेमार्फत तजवीज करणें आणि सहकारी संवर्धनासाठीं सरकारी तिजोरींतून सध्याच्या अनेकपटींनीं खर्च करणें आणि एकंदरींत कार्याच्या महत्त्वास अनुसरून विस्तृत योजना सढळ हातांनीं आखणें, इत्यादि मुद्दे ह्या लेखांत आले आहेत. त्याच्या पुढील लेखांत श्री. भास्करराव जाधव ह्यांनी कोल्हापुरांत "भिशी" "फंड" इत्यादि स्वरूपांतील सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांनीं स्वयंस्फूर्तीनें, स्वतंत्रपणानें व सरकारी नियंत्रणावांचून चालविलेल्या जुन्या पद्धतीच्या संस्थांची मनोरंजक माहिती दिली आहे. लोकांच्या मनांत परस्पर सहाय्याच्या तत्त्वाचें बीज रुजलें असतां त्याचा वृक्ष बाहेरील मदतीवांचून कसा फलदायक होतो हें तीवरून दिसून येतें. दिवाणबहादुर गांधी ह्यांनीं सहकारी संस्था रजिस्टर होण्याच्या कामीं होणाऱ्या दिरंगाईचा उल्लेख करून जनतेच्या स्वयंस्फूर्तीवर व स्वावलंबनावर अधिक विश्वास ठेवला जाण्याची आवश्यकता एका लेखांत प्रतिपादली आहे. पूर्व खानदेश जिल्ह्यांतील कपास विक्रीच्या सहकारी सोसायट्यांच्या कार्याची माहिती श्री. एन. व्ही. नायक ह्यांनी दिली आहे ती बोधप्रद आहे. सहकारी त्रैमासिकांत वरील लेखांशिवाय उपयुक्त पुस्तकांचें परीक्षण आहे. श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं "पीपल्स प्लॅन ऑफ एकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ इंडिया" ह्या इंडिअन फेडरेशन ऑफ लेबरनें तयार केलेल्या हिंदुस्थानच्या आर्थिक संवर्धनाच्या योजनेचें मार्मिक परीक्षण केलें आहे. ह्यापुढें संपादकीय स्फुट विवेचनें आलीं असून इन्स्टिट्यूटच्या कार्याची माहिती देण्यांत आली आहे. मुंबई शहराच्या सहकारी परिषदेचा वृत्तांत ह्या सदराखालीं आला आहे आणि पुढें रजिस्ट्रारनीं काढलेलीं सर्क्युलर्स दिलीं आहेत. सहकारी बँकांच्या असोसिएसनच्या एका महत्त्वाच्या सभेंतील चर्चेचा सारांश अखेर पुरवणी म्हणून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. एकंदरींनें प्रस्तुत अंक माहितीनें भरला आहे आणि तो वाचनीय व विचारप्रवर्तक झाला आहे.

---

### सहकारी प्रांतिक बँका व असोसिएशन्स ह्यांच्या प्रतिनिधींची सभा

वरील दोन अखिल भारतीय सहकारी मध्यवर्ती मंडळांची सभा मुंबई येथें तारीख २९ व ३० जुलै रोजीं सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंगमध्यें भरणार आहे. हिंदी सहकारी चळवळीच्या हिताचे महत्त्वाचे प्रश्न ह्या सभेंत चर्चिले जावयाचे आहेत.

# स्फुट विचार

### कपाशीच्या कमाल व किमान किंमती

हिंदी कापसाची निर्गत युद्धपरिस्थितीमुळें अत्यंत मर्यादित झाली आहे आणि देशांत कापडाच्या उत्पादनाच्या मानानें कपाशीच्या लागवडीचें क्षेत्र कमी करणें प्राप्त झालें आहे. विशेषतः आखूड धाग्याच्या कापसास देशांत व देशाबाहेर मागणी नसल्यानें त्याचें पीक करण्यापासून शेतकऱ्यांना परावृत्त करण्याची आवश्यकता सर्वत्र मान्य झाली आहे. ह्याच बरोबर कापसाच्या व्यवहारांतील सट्टेबाजीस आणि किंमतीमधील चढउतारास आळा बसावा म्हणून त्याच्या कमाल व किमान किंमती ठरवण्याचा उपक्रम सरकारनें गेल्या वर्षी केला. शेतकरी वर्गाच्या जीवनाचा व धंद्याचा खर्च सर्वसाधारण महागाईमुळें वाढला आहे आणि त्याचें नुकसान होणार नाहीं ह्या बेतानें कापसाच्या किंमती स्थिर ठेवण्याचें धोरण अंगिकारण्यांत आलें. ह्या भावनियंत्रणाच्या प्रश्नाशी धान्याच्या उत्पादनास उत्तेजन देण्याचा प्रश्न निगडित झाला आहे ह्या गोष्टीकडे लक्ष देणें आवश्यक आहे. आखूड धाग्याची कपास, तंबाखू वगैरे पिकांचें क्षेत्र कमी होऊन धान्यांच्या लागवडीचें क्षेत्र विस्तृत व्हावें ह्याविषयींचे प्रयत्न मुंबई सरकार करीत आहे. आज अन्नटंचाईपासून जनतेचें रक्षण करण्याचें अगत्य केवढें मोठें आहे हें सांगावयास नको. कित्येक प्रांत आणि संस्थानें ह्यांमध्यें कपाशीच्या पिकाचें नियंत्रण आणि धान्यांच्या पैदाशीस उत्तेजन ह्यांचे बाबतींत मुंबईप्रमाणें सक्तीच्या धोरणाचा अवलंब करण्यांत आलेला नाहीं आणि त्यामुळें कपाशीचें पीक करण्याच्या शेतकऱ्यांच्या प्रवृत्तीस हवा असा आळा बसलेला नाहीं. धान्यांच्या पैदाशीपेक्षा कपाशीची पैदास अधिक फायदेशार दिसल्यास कपाशीच्या लागवडीकडे शेतकरी वर्ग आकर्षला जाणें स्वाभाविक आहे. ही गोष्ट हिशेबांत धरून सरकारनें येत्या हंगामांतील कपाशीच्या किमान किंमती पन्नास रुपयांनीं कमी केल्या आहेत, पण त्याबरोबरच किमान व कमाल किंमतमधलें अंतर वाढवण्यांत आलें आहे.

---

### कपाशीच्या नियंत्रित किंमतीचा विचार

शेतीच्या उत्पादनाचा खर्च वाढला आहे आणि शेतकऱ्यांचें जीवन महागाईचें झालें आहे, ह्या दृष्टीनें त्यांस आपल्या मालाच्या किंमती योग्य प्रमाणांत मिळाल्या पाहिजेत. पण पुरेशा धान्य पुरवठ्याच्या व्यवस्थेंत सर्वच शेतकऱ्यांचें व सबंद राष्ट्राचें हित गुंतलेलें असल्यानें प्रस्तुत गुंतागुंतीचा प्रश्न सोडवतांना निरनिराळ्या महत्त्वाच्या बाबींचा मेळ घातला जाणें आवश्यक ठरतें. देशाच्या गरजेच्या मानानें फाजील असलेल्या कपाशीच्या उत्पादनास आळा घालण्याचें आणि धान्य निर्मितीस उत्तेजन देण्याचें अगत्य एकदां मान्य झालें म्हणजे कापसाच्या किंमतीचें प्रमाण काय असावें हें ठरवण्याचें तत्त्व उघड होतें. १९४४-४५ सालाच्या हंगामासाठीं हिंदुस्थान सरकारानें कापसाचे भाव कमी करून ठरवले आहेत, ह्यासंबंधांत सर चुनीलाल भाईचंद मेथा ह्यांनीं टीकात्मक विचार प्रकट केले आहेत. त्यांचें म्हणणें असें आहे कीं चालू सालासाठीं ठरवलेले कापसाचे भाव शेतकऱ्यांच्या व व्यापाऱ्यांच्या दृष्टीनें कमी होते आणि त्यांच्या विरुद्ध तक्रारहि करण्यांत आली होती. येत्या हंगामासाठीं जाहीर केलेले भाव त्याहिपेक्षा हलके असल्यानें ते अनिष्ट व असमाधानकारक आहेत. मध्यम आणि लांब धाग्याचा कापूस पिकवणारे शेतकरी व त्याचा धंदा करणारे व्यापारी ह्यांचेंहि नवीन जाहीर झालेल्या किंमतीमुळें नुकसान होणार आहे असें मत सर चुनीलाल ह्यांनीं व्यक्त केलें आहे. शेतीचा खर्च वाढला आहे व शेतकऱ्याची रहाणी महागाईची झाली आहे, पण कापूस सस्तावून शेतकऱ्याची प्राप्ती घटली आहे ह्यामुळें १९४४–४५ च्या हंगामांतील कपाशीचे दर कमी करण्यास वाव नाहीं असें त्यांचें प्रतिपादन आहे. परंतु धान्यांच्या पिकांचें आणि त्यांच्या किंमतींचें काय ? धान्य महागलें तर कपास पिकवणारांस आणि सबंध जनतेस तें चालेल काय ? कपास करणाऱ्यांच्या बाजूचा विचार करतांना सर्व शेतकऱ्यांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्याकडे लक्ष पुरवलें गेलें पाहिजे. कापसाचे किमान भाव ठरवण्यांत आले आहेत त्यास चिकटून प्रत्यक्ष किंमती रहातील असें मानण्याचें कारण नाहीं, ह्या आशयाचें स्पष्टीकरण सरकारच्या वतीनें पुढें मांडण्यांत आलें आहे; आणि बाजारभाव त्या मर्यादेवर राहिलेच तर कापसाचा पुरवठा व त्यास असलेली मागणी ह्यांच्या दृष्टीनें ते भाव योग्य आहेत ही गोष्ट व्यवहारानेंच सिद्ध होईल हा युक्तिवादहि विचारप्रवर्तक आहे.

---

### अन्नपुरवठ्याची दिल्लींत चर्चा

बाहेरून धान्य पुरेशा प्रमाणांत आणल्यावांचून हिंदुस्थानांत अन्न पुरवठा पाहिजे त्या मानानें होणार नाहीं ही गोष्ट मि. एमरी ह्यांचे मनावर ठसवण्याचा प्रयत्न सारखा चालू आहे. कॉमन्स सभेंत त्या संबंधांत पुन्हां गेल्या आठवड्यांत प्रश्न विचारण्यांत आले आणि युद्धपरिस्थितींतील जहाज वहातुकीच्या अडचणी लक्षांत घेतां हिंदुस्थानास शक्य तेवढें व शक्य त्या मार्गांनीं धान्य पाठवण्याची खटपट केली जात आहे असें स्टेट सेक्रेटरींनीं उत्तर दिलें. हिंदुस्थान सरकारचे अन्न मंत्री, सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव, ह्यांनीं मध्यवर्ती अन्न सल्लागार समितीच्या सभेंत दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत भाषण करतांना ग्रेगरी कमिटीच्या शिफारसीस अनुसरून धान्याची आयात ह्या देशांत होण्याचा आग्रह आपण सोडणार नाहीं असें सांगितलें. अन्न पुरवठ्याबाबत सरकारनें काय योजना अंमलांत आणली आहे हें सांगतांना अन्नमंत्री म्हणाले कीं धान्याच्या निर्गतीची बंदी करण्यांत आली आहे आणि शिधापद्धतीचा विस्तार झपाट्यानें केला जात आहे. एकूण साडेतीन कोटि वस्ती असलेल्या दोनशे सहवीस शहरांत ही पद्धति आतां अंमलांत आहे. गहूं, बाजरी व ज्वारी ह्या धान्यांच्या फायदेशीर किमती ठरवण्यांत आल्या आहेत आणि त्या शेतकऱ्यांस हटकून मिळण्याची तरतूद झाली आहे. तांदुळाच्या बाबतींत नियंत्रण आहे पण वरील धान्यांप्रमाणें अखिल भारतीय पायावर त्याच्या किंमती निश्चित झालेल्या नाहींत. धान्याचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता निर्विवाद आहे. पण तें जमविणें व वाटणें ह्यांचे संबंधांतली व्यवस्था पायाशुद्ध व समाधानकारक होणें अगत्याचें असल्याचें अन्नमंत्र्यांनीं सांगितलें आणि त्या बाबतींत सल्लागार समितीचें सहकार्य मागितलें. धान्याची साठवण व तिची देखरेख, धान्य चांगल्या स्थितींत राहाण्याची व पुरवलें जाण्याची व्यवस्था, अन्नाचा पुरवठा गरीब-श्रीमंतांस आणि शहरी व खेडगावी जनतेस सारखा होण्याविषयींची खबरदारी आणि दुधा सारखे संरक्षक अन्नाचे जिन्नस योग्य प्रमाणांत लोकांस मिळवण्याची तरतूद ह्या बाबींचा विचार करून त्यांचे विषयीं सूचना करण्याची विनंति सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं सल्लागार समितीस केली. मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक व संस्थानी सरकारें ह्यांच्या सहकार्यानें व एकविचारानें अन्न पुरवठ्याचा प्रश्न सध्यापेक्षां अधिक समाधानकारक रीतीनें सोडवला जाईल अशी आशा आहे.

## भाडेकरी व घरमालक

( संपादक: श्री. वि. गाडगीळ, एम्. ए., एलएल. बी.;
प्रकाशक: दी डेक्कन पब्लिशर्स लि. पुणें २, किंमत १॥ रुपया)

भाडेकरी व घरमालक हें पुस्तक पुणें घरभाडेकरू संघाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. गाडगीळ, एम्. ए. एलएल. बी., वकील, यांनीं संपादन करून घरमालक व भाडेकरू यांची मोठी सोय केली आहे. घरमालक व भाडेकरू या दोघांमध्येंहि कायद्याच्या वास्तविक ज्ञानासंबंधीं गैरसमज प्रचलित असल्याचें आढळून आल्यावरून हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे व पुस्तकांतील एकंदर मजकुरावरून हा हेतू सिद्धीस गेल्याचें आढळून येईल. सदर पुस्तकांत मराठीमध्यें या विषयावरील सर्व कायद्यांचें सुबोध सटीक विवेचन करण्यांत आलें असून त्यांत कायद्याच्या भाषेंतील क्लिष्टता क्वचितच आढळून येते.

भाडेनियंत्रण हुकूम व जागा सवलतीचा कायदा यासंबंधींचें विवेचन विशेष विस्तारपूर्वक करण्यांत आलें आहे व मिळकतीच्या कायद्यांतील तत्त्वास धरून पहिल्या सात आठ प्रकरणांत घरमालक व भाडेकरू यांचे संबंध कसे असावयास पाहिजेत व त्या दोघांचे हक्क व जबाबदाऱ्या कशा असावयास पाहिजेत हें दाखविलें आहे.

हल्लीं घरमालक व भाडेकरू यांचेमधील तंटे बरेच होऊं लागल्यामुळें अशा पुस्तकाची गरज फार भासत होती ती या पुस्तकानें भरून निघाली आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.

पुस्तकाच्या शेवटीं हल्लींच्या जागा सवलतीचा नवीन कायदा, मिळकतीच्या कायद्यांतील मालक भाडेकरू प्रकरण, भाडें नियंत्रण हुकूम व मुंबईचा भाडें नियंत्रण कायदा, अशा चार कायद्यांचीं परिशिष्टें इंग्रजींत दिल्यामुळें पुस्तकाच्या उपयुक्ततेंत भर पडलेली आहे. हें एक पुस्तक जवळ असलें म्हणजे घर मालक व भाडेकरी यांच्या संबंधांत निराळें पुस्तक जवळ बाळगण्याची जरूर भासणार नाहीं.

---

## नाशिक जिल्ह्यांतील तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्सची परिषद

नाशिक जिल्ह्यांतील सर्व तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्सची परिषद १२ जून, १९४४ रोजीं नाशिक येथें भरली होती. प्रत्येक ता. डे. असोसिएशनचे पांच प्रतिनिधी बोलविण्यांत आले होते. सर्व असोसिएशन्सनीं परिषदेच्या कामांत लक्ष घातलें. शेतकऱ्यांच्या अडचणींचा विचार करणें, डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट असोसिएशनच्या कामाची पुनर्घटना करणें व सर्व तालुका असोसिएशन्सच्या कामांत एकसूत्रीपणा आणणें, हा परिषदेचा हेतु होता. अध्यक्षस्थान कॅप्टन एस. जी. खोत, ( इं. मे. आर्मी कोअर, एज्युकेशनल ऑफिसर, टी. डी. सेंटर्स, देवळाली ) हे होते. नाशिक जिल्हा डे. असोसिएशनचे उपाध्यक्ष दि. ब. वंडेकर, ह्यांनीं परिषद यशस्वी करण्याचे कामीं विशेष मेहनत घेतली व त्यांस एज्युकेशनल सुपरव्हायझर श्री. वाणी व नाशिक ता. डे. असोसिएशनचे सेक्रेटरी श्री. शिंदे व श्री. राजेंद्र ह्यांनीं मदत केली.

## कराराची पूर्तता अशक्य झाल्यास ॲडव्हान्सची रक्कम परत

वादी कंपनीचें ( मनसेह फिल्म कंपनी ) नांव जपानी असलें तरी तिचे मालक थिरुवनगाडा मुदलियार व त्याचा अज्ञान मुलगा सौंदराजन हे दोन भागीदार हिंदुस्थानांतील रहिवाशी होते. त्यांनीं आपली पेढी सिंगापूर येथें स्थापन केली होती. वादी नं. १ आक्टोबर १९४१ मध्यें मद्रासला आला व त्यानें प्रतिवादी कंपनीशीं ( जेमिनी पिक्चर सर्किट ) असा करार केला कीं, प्रतिवादी कंपनी त्यावेळीं तयार करीत असलेली 'भक्त नारद' ही फिल्म फेडरेटेड मलाया स्टेट पीनाँग व सिंगापूर येथें दाखविण्याकरितां ३ वर्षे भाड्यानें द्यावी. भाड्याची रक्कम रु. ९०००-ठरली व त्यापैकीं निमी रक्कम रु. ४५०० वादीनें तावडतोब ॲडव्हान्स म्हणून प्रतिवादीस दिले. सिनेमाची फिल्म मार्च १९४२ मध्यें प्रतिवादीनें वादीस द्यावी असें ठरलें. करारापासून दोनच महिन्यांत जपाननें युद्ध पुकारलें व सिंगापूर जपानच्या ताब्यांत गेलें. वादी हिंदुस्थानांतच अडकून पडले. ज्या देशांत सिनेमा दाखवावयाचा ठरला होता तो शत्रूच्या ताब्यांत गेल्यामुळें वादी-प्रतिवादींमध्यें झालेला करार पुरा होणें कराराच्या कायद्याच्या कलम ५६ प्रमाणें अशक्य झालें. म्हणून वादींनीं प्रतिवादीला दिलेला ॲडव्हान्स व्याजासह परत मागण्याचा मद्रास हायकोर्टांत दावा केला. प्रतिवादीची तक्रार अशी होती कीं, "आपण ठरलेल्या कराराप्रमाणें 'भक्त नारद' ही फिल्म देण्यास तयार आहों" तेव्हां युद्धामुळें वादीला सिंगापूर वगैरे ठिकाणीं पिक्चर दाखवितां येत नसल्यास त्याबद्दल प्रतिवादी जबाबदार नाहींत. परंतु वादी कलम ५६ व ६५ चा आधार घेतो. कलम ५६ प्रमाणें पार्टीच्या अपराधाशिवाय कोणत्याहि योग्य कारणामुळें एखादा करार पुरा करणें अशक्य झाल्यास तो करार रद्द ( void ) होतो व कलम ६५ प्रमाणें अशा रद्द ठरलेल्या कराराच्यामुळें जर एखाद्या पार्टीला कांहीं ॲडव्हान्स मिळाला असेल तर तो त्यानें परत केला पाहिजे. युद्ध उत्पन्न झालें व केव्हां थांबेल हें आज ठरवितां येत नाहीं. त्यामुळें वादीला सिंगापूर वगैरे ठिकाणीं पिक्चर दाखविणें अशक्य झालें यांत वादीचा कांहींच दोष नाहीं म्हणून वादीतर्फे डिक्री झाली.

सारांश—एखादा करार झाल्यावर करार करणाऱ्या इसमाचा कोणताही अपराध नसतां दुसऱ्याच कांहीं कारणामुळें तो करार पुरा करणें अशक्य झालें तर तो करार रद्द ठरतो. युद्ध हें अशाचपैकीं एक कारण आहे. एकदां करार रद्द झाल्यावर त्या कराराच्या वेळीं एका इसमानें दुसऱ्याला इसार वगैरे दिला असेल तर त्यानें तो परत केला पाहिजे. —न्यायबोध.

---

## वाटपाचें काम करणाऱ्या सहकारी सोसायट्यांच्या विक्रेत्यांकरितां व सेक्रेटरींकरितां ट्रेनिंग क्लास.

वरील वर्गाचें उद्घाटन नाशिक जिल्ह्यांतील सहकारी सोसायट्यांचे ऑनररी ऑर्गनायझर, दि. ब. वंडेकर, ह्यांनीं नाशिक येथें ता. ५ जुलै रोजीं केलें. अध्यक्षस्थानीं मालेगावचे प्रांत ऑफिसर श्री. सोनटक्के हे होते. वर्ग १० दिवस चालू होता व त्याचा फायदा २३ उमेदवारांनीं घेतला.

## हिंदी शेतीस कृत्रिम खतांचा पुरवठा.

हिंदुस्थानांतील शेती अत्यंत मागासलेली आहे. हिंदुस्थानांत दर एकरीं जितकें उत्पादन होतें तितकें थोडें उत्पादन जगांत इतरत्र कोठेंच होत नसेल. या स्थितीस अनेक कारणें आहेत, पण त्यांपैकीं खताचें दुर्भिक्ष्य हें सर्वांत परिणामकारक आहे. ऊंस सोडून बाकी कोठल्याच पिकास पुरेसें खत दिलें जात नाहीं. हिंदुस्थानच्या सर्व जनतेस जर हिंदुस्थानांत पिकणारेंच धान्य पुरवावयाचें असेल तर पिकांस हल्लींपेक्षां बऱ्याच मोठ्या प्रमाणावर खतांचा पुरवठा करावयास पाहिजे हें उघड आहे. केवळ शेणखतानें ही गरज भागेल हें शक्य नाहीं, तर मोठ्या प्रमाणावर कृत्रिम खतें वापरलीं पाहिजेत व शिवाय स्वावलंबनाच्या दृष्टीनें तीं येथेंच केलीं पाहिजेत. नुसतें कृत्रिम खतांचें उत्पादन करूनही भागणार नाहीं, तर त्यांचा उपयोग कसा करावा याबद्दल शेतकऱ्यांस शास्त्रीय रीत्या शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे. हें काम सरकारनें वा खतें तयार करणाऱ्या कंपन्यांनीं केलें पाहिजे. या प्रश्नांस तोंड फोडण्यासाठींच खत पुरवठ्याच्या प्रश्नांचा सखोल विचार करण्यासाठीं सरकारनें नुकतीच एक समिति नेमली आहे.

वनस्पतींस जीं अनेक द्रव्यें लागतात त्यांपैकीं कार्बन, हैड्रोजन, ऑक्सिजन, नैट्रोजन, फॉस्फरस व पोटॅशियम हीं सोडून इतर द्रव्यें सर्व जमिनींत असतात. वरीलपैकीं पहिलीं तीन द्रव्यें हवा व पाणी यांपासून झाडांस मिळतात, उरलेल्या तिघांचा पुरवठा खतांतून होतो. प्राणिजन्य खतांत ( मासळी, व खाटिक खान्यांत वायां जाणारे भाग इ. ) तीनही द्रव्यें जरूर त्या प्रमाणांत असतात. कृत्रिम खतांत मात्र साधारणतः एक वा क्वचित दोन द्रव्यें असतात, त्यामुळें जमिनीची परीक्षा करून योग्य त्या प्रमाणांत तीं मिसळावीं लागतात.

पोटॅशियम बहुधा पोटॅशियम क्लोराईड व सल्फेट या स्वरूपांत वापरतात. पोटॅशियम् बहुतेक सर्व खडकांत असतो त्यामुळें नदीच्या गाळांतही असतो. मात्र शुद्ध पोटॅशचे क्षार हिंदुस्थानांत अजून मोठ्या प्रमाणावर होत नाहींत. पोटॅशचा साबणाच्या व कांचेच्या कारखानदारींतही फार मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. पोटॅश खाणींत सांपडतो. त्याचा जगांतील सर्वांत मोठा पुरवठा जर्मनींतील स्टासफुर्टच्या खाणींतून होत असे. हिंदुस्थानांतही पोटॅशच्या खाणी आहेत.

फॉस्फरस मुख्यतः सुपरफॉस्फेटच्या वा डबल फॉस्फेटच्या रूपानें वापरतात. सुपरफॉस्फेट व डबल फॉस्फेट हीं कॅलशियम फॉस्फेट व अनुक्रमें सल्फ्यूरिक व फॉस्फॉरिक ॲसिड यांच्या रासायनिक क्रियेनें होतात. सल्फ्यूरिक ॲसिड हिंदुस्थानांत अजून दुर्मिळ आहे, व पुढेंही विशेष कमी दुर्मिळ होईल असें वाटत नाहीं, कारण सल्फर ( गंधक ) हें द्रव्य येथें अजून मोठ्या प्रमाणावर होत नाहीं. कॅलशियम फॉस्फेट "फॉस्फेटिक रॉक" या रूपांत मिळतें. त्याचे उत्तर आफ्रिकेंत व मध्यपूर्वेंत मोठे डोंगर आहेत. फॉस्फरस हाडांतही बराच असतो व बोनमील म्हणजे हाडांची पूड च होय. वर उल्लेखिलेले डोंगर लाखों वर्षांपूर्वीं दिवंगत झालेल्या प्राण्यांचे अवशेषच आहेत. हिंदुस्थानांत सिंगभूम जिल्हा (बिहार) व त्रिचनापल्ली जिल्हा येथें अशुद्ध स्वरूपात फॉस्फेट सांपडतें. परंतु त्यापासून फॉस्फेट करण्याचे प्रयत्न अजून किफायतशीर होत नाहींत. फॉस्फरसचा दुसऱ्या एका स्वरूपांतही शेतीस उपयोग होतो, त्यापासून उंदीर व घुशी मारण्यास विषारी गोळ्या करतात.

वरील द्रव्यापेक्षां बऱ्याच मोठ्या प्रमाणावर नैट्रोजनचीं खतें लागतात. सुदैवानें ईश्वरानें सर्व राष्ट्रांस नायट्रोजनचा भरपूर पुरवठा केला आहे, कारण हवा ८०% नैट्रोजनच असते. मात्र हवेंत सांपडतो त्या स्थितींत त्याचा वनस्पतींस उपयोग करतां येत नाहीं. तसा उपयोग होण्यास नैट्रोजनचा इतर कोणत्यातरी द्रव्याशीं रासायनिक संयोग झालेला असावा लागतो.

वनस्पतींस नायट्रोजन नायट्रेटच्या रूपांत लागतो म्हणून नायट्रेट खत वापरणें उत्तम, परंतु इतर स्वरूपात असलेल्या नैट्रोजनचें जमिनींतील कृमि नायट्रेटमध्यें रूपांतर करतात त्यामुळें नायट्रेटच पाहिजे असें नाहीं, तर इतर रूपांतही नैट्रोजन चालतो. नायट्रोजन बाजारांत मुख्यतः ( १ ) चिली नायट्रेट ( सॉल्टपिटर ) ( २ ) बेंगाल नायट्रेट ( सोरा ) ( यांत पोटॅश सुद्धा असतो ) ( ३ ) अमोनियम सल्फेट ( ४ ) अमोनियम नायट्रेट ( ५ ) अमोफॉस ( यांत फॉस्फरस सुद्धां असतो ) ( ६ ) यूरिया ( ७ ) सायनामाइड या स्वरूपांत मिळतो. पहिली दोन खतें अनुक्रमें चिली व बंगाल येथें जमिनीवर सांपडतात. सायनामाइड हें कार्बाइडपासून करतात व कार्बाइड करण्यास भरपूर वीज लागते त्यामुळें तें हिंदुस्थानांत सध्या तयार करणें अवघड आहे. उरलेलीं खतें म्हणजे अमोनियम क्षार व यूरिया यांकडे अधिक लक्ष देणें जरूर आहे. हीं सर्व अमोनियापासून होतात. अमोनियाचा पुरवठा दोन प्रकारें होतो.

(१) दगडी कोळशाचा गॅस करतांना निघणारें डांबर व (२) कृत्रिम अमोनिया. पहिल्या प्रकारें अमोनिया मिळणें हिंदी शहरांत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर गॅसचा उपयोग झाला तरच शक्य आहे. राहतां राहिला कृत्रिम अमोनिया. बरेच श्रम व संशोधन केल्यास येथें अमोनिया करणें अशक्य नाहीं. आज जगांत मनुष्यहानी करण्यासाठीं वर्षाकाठीं लाखों टन नायट्रिक ॲसिडच्या क्षारांचा उपयोग केला जात आहे. हे सर्व नायट्रिक ॲसिड कृत्रिम अमोनियापासूनच तयार केलेलें असतें, याचा विचार केल्यास लक्षांत येईल कीं कोणत्याही एका राष्ट्रास अमोनियाची मक्तेदारी दिलेली नाहीं व हिंदुस्थानांतही अमोनिया तयार करणें किफायतशीर होणें शक्य आहे. कृत्रिम अमोनिया करण्यास नैट्रोजन व हैड्रोजन लागतात. यांचें जरूर तें मिश्रण हवा, पाणी व कोळसा यांपासून तयार होतें व जोडीस कार्बानिक ॲसिड वायूही होतो. हें मिश्रण तीव्र दाबाखालीं ( चौरस इंचास २००० पौंडांच्या वर ) असतांना कांहीं विशिष्ट द्रव्यावरून नेलें असतां रासायनिक मिलन होऊन अमोनिया तयार होतो. ही कृति इ. स. १९१५ मध्यें जर्मनींत डॉ. हाबर यानें शोधून काढली. अमोनियापासून इतर अनेक द्रव्येंही करितां येतात व हिंदी स्वावलंबनाच्या दृष्टीनें भांडवलदारांनीं या धंद्यांत लक्ष घालणें अगत्याचें आहे.

---

### लष्करी वाहनांचे अपघात

लष्करी वहानांच्या अपघातासंबंधी लोकमताची तीव्रता किती आहे, हें वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाइल असोसिएशनच्या अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत नुकतेंच सांगितलें. या वहानांच्या ड्रायव्हरांना सर्व लोकांना लागू असणारे वहातुकीचे नियम लागू करावे किंवा निदान त्या ड्रायव्हरांच्या गुन्ह्यांची चौकशी लष्करी व बिन लष्करी अशा मिश्र कोर्टामार्फत व्हावी असें त्यांनीं सुचविलें.

## पुणें येथें सहकारी शिक्षणाचा वर्ग

### प्रो. काळे ह्यांच्या हस्तें उद्घाटन

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें महाराष्ट्रासाठी पुणें येथें शिक्षणाचा वर्ग चालू करण्यांत आला आहे. त्याचें उद्घाटन सेंट्रल सहकारी बँकेच्या दिवाणखान्यांत प्रो. काळे ह्यांच्या हस्तें झालें. वर्गाचे ऑनररी प्रिन्सिपॉल श्री. एस. आर. पाळंदे, एम. ए., एलएल. बी. ह्यांनी प्रथम वर्गाचा उद्देश, अभ्यासक्रम, त्याची व्यवस्था, इत्यादि विषयीं थोडक्यांत माहिती दिली. औपचारिक-रीतिनें वर्गाचें उद्घाटन करण्यापूर्वी त्यांतील शिक्षणाचें महत्त्व प्रो. काळे ह्यांनीं विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवलें. त्यांच्या भाषणाचा मथितार्थ असा:—कोठलाहि धंदा अगर व्यवहार अनुभवानें शिकतां येत असला तरी त्याच्या मुळाशीं असलेलीं तत्त्वें समजलीं असतां कार्यक्षमता वाढण्यास सहाय होतें. ह्याकरितांच सरकारी व इतर नोकरांचें भक्कम पायावर शिक्षण झालेलें असावें अशी अपेक्षा अलीकडे सर्वत्र असते. अभ्यासक्रम विस्तृत आणि जड आहे असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे, पण सहकारी कार्यांशीं ज्यांचा संबंध येतो अशा सर्व विषयांचें मूळग्राही ज्ञान तें अंगावर घेणारांस मिळणें अगत्याचें आहे. तत्त्व आणि व्यवहार ह्यांची सांगड विशेष फलप्रद होते. युद्धोत्तर काळांत घडवून आणावयाच्या आर्थिक अभिवृद्धींत शेती व सहकार ह्यांच्या सुधारणेस महत्त्वाचें स्थान देण्यांत येणार आहे. सहकारी संस्थांची संख्या किती तरी पटींनीं वाढवावी लागेल आणि त्यांच्या कार्याच्या व्याप्तींत वाढ करावी लागेल. सहकारी चळवळीपुरती संवर्धनाची योजना कार्यकर्त्यांनीं व सरकारनें तयार केली पाहिजे. खेडेगावांच्या सुधारणेचा प्रश्न हिंदुस्थान सरकारनें व प्रांतिक सरकारनें हातीं घेतला आहे. त्यांच्या योजनेंत सहकारी संघटनास योग्य स्थान मिळेल अशा तऱ्हेचा प्रयत्न सहकारी पुढाऱ्यांनीं करणें आवश्यक आहे. सहकारी संघटनाची सर्वांगीण व सोपपत्तिक माहिती असलेल्या लोकांचा मोठा पुरवठा व्हावा लागेल आणि आपल्यासारखे किती तरी वर्ग चालवून शिकलेले लोक तयार करावे लागतील. इन्स्टिट्यूटच्या शिक्षणव्यवस्थेचा पूर्ण फायदा होतकरू कार्यकर्त्यांनीं घेतला पाहिजे. सहकारी कार्यांत स्वार्थ व लोकसेवा साधण्याची संधि सर्वांस मिळत असते हें ध्यानांत वागवणें आवश्यक आहे. प्रस्तुत वर्गांत तात्विक व व्यवहारी शिक्षण देण्यांत येईल, त्याचें चीज विद्यार्थी करतील अशी आशा आहे. रा. सा. खोले ह्यांनीं प्रो. काळे आणि निमंत्रित पाहुणे यांचे आभार मानल्यावर समारंभ संपला.

## निरा व कल्याण येथें अमोनियम सल्फेटचे कारखाने निघणार!

रासायनिक खतांचे, विशेषत: अमोनियम सल्फेटचे कारखाने हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर काढण्याकरितां सल्ला देण्यासाठी हिंदुस्थानांत दाखल झालेलें ब्रिटिश तज्ज्ञांचें मंडळ पुणें येथें ता. २८ जुलै रोजीं येईल. महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांच्या उंसास जवळ पडणारें निरा व आजूबाजूच्या भाताच्या पिकांस सोईस्कर कल्याण अशीं दोन केंद्रें कारखान्यांच्या स्थापनेस सोईचीं होतील असें बोललें जात आहे. रासायनिक खतांच्या उत्पादनास स्वस्त आणि मुबलक वीज अथवा कोळसा ह्यांची आवश्यकता असते. मुंबई प्रांतांतील नियोजित कारखान्यांस विजेच्या पुरवठ्याची अडचण भासणार नाहीं.


बॉन्डेड लॅबोरेटरीसाठी

## ठेवी घेणें आहेत

मागोरा केमिकल कं. लि., तिच्या अनेक शोधामुळें व मालामुळें जनतेच्या परिचयाची झालेलीच आहे. आता डॉक्टर लोकांना लागणारी टिंक्चर्स, एक्स्ट्राक्ट्स, सायरप्स्, टॅबलेट्स इ. इंग्रजी औषधें तयार करण्यासाठीं बाँडेड लॅबोरेटरीची परवानगी सरकारकडून कंपनीला मिळाली असून त्या बाबतींत जरूर ती सर्व तयारीहि पूर्ण झाली आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत वरीलपैकीं बरीचशीं औषधें बाजारांत येतील. मुंबईखेरीज अखिल महाराष्ट्रांत इतरत्र कोठेहि अशा तऱ्हेची लॅबोरेटरी नाहीं. ही लॅबोरेटरी सुरू करण्याचा पहिला मान 'मागोरा केमिकल कं. लि.' नें अवघ्या १ वर्षांतच मिळविलेला आहे, हें नमूद करण्यास अभिमान वाटतो. वरील सर्व औषधें नेहमींच मोठ्या प्रमाणावर लागत असतात. युद्धापूर्वी त्यांतील बरीचशीं परदेशाहून येत असत. आतां तीं येत नसल्यामुळें देशी उद्योगधंद्यांना या धंद्यांत भरपूर वाव आहे.

मागोरा कंपनीनें मध्यंतरी कांहीं दिवस ठेवी घेण्याचें बंद केलें होतें. परंतु वरील सर्व गोष्टींसाठी आतां रु. २० हजारपर्यंत ठेवी स्वीकारण्याचें ठरविलें आहे. कंपनीचे चालू भागीदार व ठेवीदार यांना प्रथम संधी दिली जाईल. रु. ५०० पेक्षा कमी रकमेची ठेव स्वीकारली जाणार नाहीं.

मुदत व दर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्ष | द. | सा. | द. | शें. | ४ | टक्के |
| २ | वर्षें | ” | ” | ” | ” | ४½ | ” |
| ३ | वर्षें | ” | ” | ” | ” | ५ | टक्के |

जास्त माहितीसाठीं लिहा अगर भेटा.—

आर. वाय. रानडे अँण्ड को,
मॅनेजिंग एजंटस,
मागोरा केमिकल कं. लि., हिराबाग, पुणें २.

तुमच्या आवडींत व ऐपतींत प्रसिद्धीचें प्रभावी साधन

## कॅलेंडर्स

( १९४५ )

नवीन आकर्षक चित्रांचा आल्बम तयार होत आहे.—
प्रमुख ठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.

## दि आर्ट कॅलेंडर्स लि.

१५ बुधवार पेठ, पुणें २

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. धनंजय वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.